| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण<br>पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003<br>दुरध्वनी नंबर 0253-2309700<br>E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |


**प्रेस नोट** दिनांक : १८/०३/२०२४

# गुजरात राज्याचे (GSRTC) बसमधुन अवैधरित्या होणारी मद्याची तस्करी रोखण्यात नाशिक ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेला यश

---

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे तसेच सर्व प्रकारच्या अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी निवडणुक आयोग, मा. विशेष पोलीस महानिरीक्षक नाशिक परिक्षेत्र, नाशिक व नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने यांचे आदेशान्वये संपुर्ण नाशिक जिल्हयात सत्वर कारवाई करण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने जिल्हयातील राज्य व राष्ट्रीय महामार्गांवरून अवैधरित्या होणारी मद्याची वाहतुक व विक्री रोखण्यासाठी जिल्हयाचे सीमावर्ती भागांमधील चेकपोस्टवर सतर्क नाकाबंदी लावून अवैध कारवायांना प्रतिबंध घालण्यात येत आहेत. त्यानुसार आज दिनांक १८/०३/२०२४ रोजी गुजरात राज्य परिवहन महामंडळ (GSRTC), नाशिक - सुरत बस क्र. **GJ-18-Z-8970** या बसमधून मद्याची अवैधरित्या तस्करी होत असल्याची गुप्त बातमी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे यांना मिळाली होती. त्याप्रमाणे स्था.गु.शा.चे पथकाने नाशिक ते सुरत महामार्गावर दिंडोरी परिसरात सापळा रचुन गुजरात राज्यात जात असलेली वरील बस थांबवुन तपासणी केली असता, त्यामध्ये रूपये १,१४,६३५/- किंमतीचा विदेशी मद्यसाठा विनापरवाना अवैधरित्या वाहतुक करतांना मिळुन आलेला आहे.

सदर प्रकरणी दिंडोरी पोलीस ठाणे येथे गुरनं १३८/२०२४ महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयात खालील नमुद आरोपीतांना अटक केली आहे.

१) विजय विनोद बलसार, वय ५२ वर्षे, रा. सुरत (बस चालक)
२) अमृतभाई भुवनभाई पटेल, वय ५६ वर्षे, रा. सुरत (बस कन्डक्टर)

सदर गुन्हयात पुढील तपासात किस्मत ब्रॅन्डी शॉप, पंचवटी, नाशिक याचे मालक तसेच अवैध मद्यसाठयाच्या वाहतुकीस मदत करणारे इसमांना पाहिजे आरोपीत दर्शविण्यात आले आहे. तसेच अशा पध्दतीने अन्य कोणी वाईन शॉप चालक / मालक अवैधरित्या मद्याची विक्री, तस्करी करीत असल्यास त्याचेबाबत अधिक माहिती घेवून राज्य उत्पादन शुल्क विभाग नाशिक यांचे मदतीने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

सदरची कारवाई नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक श्री. आदित्य मिरखेलकर यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे, पोहवा प्रविण सानप, किशोर खराटे, पोकॉ जाधव, बोडके, मोरे यांचे पथकाने सदरची कामगिरी केली आहे.